MHKO100002012011

**नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०११**

सरस्वती हजारे वगैरे.
//वि//
सुभाष शिलेदार.

**निशाणी क्र. १३४ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी व आदेश १, नियम १० अन्वये पक्षकारांना समील करुन घेणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.१३५ येथे म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, त्यांनी सदरचा दावा वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी यांनी कैफियत देऊन वादीचे हक्क नाकारलेले आहेत. दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी खेरीज कोणाचेही हक्क नाहीत. परंतु, भविष्यात वाटपाचा दावा मंजुर झालेस वाटपाचे वेळी लगत खातेदार अगर सहहिस्सेदार यांची हरकत राहू नये यासाठी आणि काही पक्षकरांनी दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी फेरफार करुन आपली नांवे बेकायदेशिरित्या लावून घेतलेली आहेत. त्यामुळे, त्यांना प्रतिवादी म्हणुन सामाविष्ट करणे व त्याअनुषंगाने दावेत दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, वादी यांनी अर्जात नमुद प्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली व अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३ वादी यांचेतर्फे वकीलांनी त्यांच्या कथनांच्या पृष्टयर्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतलेला आहे-

01. *Dnynoba Narayan Dhore (D) through Lrs. & Ors. Vs. Smt. Champabai Deoji Dhore (D) through Lrs., 2022(2) ALL MR 391,*
02. *Jwaladutta Jankidas Vs. Jayant Bhavanji Soni & Anr., 2022(2) ALL MR 220.*

०४. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१३५ येथे प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविली व असे कथन केले की, वादीचा दुरुस्तीचा अर्ज हा चुकीचा व खोटा असुन वस्तुस्थितीशी

विसंगत आहे. तसेच, वादीने प्रस्तुतचा अर्ज हा १३ ते १४ वर्षांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. वादीने दावा सन २०११ साली दाखल केलेला असुन दावा दाखल करतेवेळी दाव्याचे ७/१२ उता-यावर प्रस्तावित प्रतिवादींचे बाबत माहिती असताना देखील त्यांना दाव्यात पक्षकार केलेले नाही. तसेच, वादीने निशाणी क्र.७९ वर अर्ज दाखल करुन मृत्युपत्राबाबत दुरुस्तीची मागणी केली होती आणि सदरचा अर्ज हा नामंजुर झालेला आहे. त्यामुळे, वादीस पुन्हा त्याबाबत दुरुस्तीची मागणी करता येणार नाही. वादीने मागणी केल्याप्रमाणे नमुद व्यक्ती हे प्रस्तुत प्रकरणातील आवश्यक पक्षकार नाहीत. त्यामुळे, त्यांना दाव्यात सामील करण्याची आवश्यकता नाही. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा केवळ दावा प्रलंबित ठेवण्याकरीता दाखल केला असल्याने तो खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली.

०५. प्रतिवादी यांचेतर्फे वकीलांनी त्यांच्या कथनांच्या पृष्टयर्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतलेला आहे-

01. *Doma Choudhary And Others Vs. Ram Nareshlal And Ors (1959) AIR (Patna) 121,*

02. *Prakash Ratanlal @ Ratansa Kasari Vs. Bhika Banda Dhage & Anr., 2010(Supp.) Bom.C.R. 131,*

03. *Abdul Gafoor Abdul Rehman Vs. Deputy Executive Engineer & Anr., 2010(Supp.) Bom.C.R. 128,*

04. *Rajendra Ramchoddas Badshah Vs. Deepak Ishwardas & Ors. 2009(6) Bom.C.R. 412,*

05. *Vishnu Pandurang Powar Vs. Dropadabai Subhash Pawar & Ors., 2010(Supp.) Bom.C.R. 212,*

06. *Alkapuri Co- Operative Housing Society Ltd. Vs. Jayantibhai Naginbhai (deceased) Thr. Lrs., 2009(2) Bom.C.R. 42.*

०६. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचेखेरीज कोणाचेही हक्क नाहीत. परंतु, दावा मिळकतीलगत अगर सहहिस्सेदार यांची हरकत राहू नये यासाठी त्यांना नाममात्र पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. वादींचे सदर कथन पाहता दावा हा वाटपाकरीता दाखल असुन दावा मिळकतीमधील वादी व प्रतिवादी यांचे व्यतिरिक्त इतर

कोणाचेही हक्क नाहीत. वादींचे कथनाप्रमाणे केवळ वाटपाचा दावा निकाली करतेवेळी लगत धारक व सहहिस्सेदार यांची हरकत राहू नये म्हणुन त्यांना नाममात्र पक्षकार करणे आवश्यक आहे. परंतु, ज्यावेळी दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे हक्क आव्हानित झालेले नाहीत आणि प्रस्तावित पक्षकार हे नाममात्र पक्षकार आहेत त्यावेळी त्यांना वाटपाच्या दाव्यामध्ये पक्षकार करणे आवश्यक नाही.

०७. याशिवाय, प्रस्तुत दावा हा सन २०११ साली दाखल झाला असुन दाव्यामध्ये सन २०१४ साली मुद्दे काढण्यात आलेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज हा १० वर्षांनी सन २०२४ मध्ये दाखल करण्यात आलेला आहे. परंतु, वादींनी सदर १० वर्षांचे विलंबाकरीता कोणतेही कारणच नमुद केलेले नाही. त्यामुळे, सदर १० वर्षांचा विलंबाचा विचार करता, त्याबाबत कोणतेही कारण दिलेले नसताना आणि प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचे गुणदोषावर निकाल देणेकरीता आवश्यक नसल्याने वादींना मागणी केलेप्रमाणे याघडीला दुरुस्तीची परवानगी देता येणार नाही.

०८. वादींनी दाखल केलेल्या *Dnynoba Narayan Dhule (Supra)* या न्यायनिर्णयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने वादीने मनाईकरीता दावा दाखल केलेला असताना त्यामध्ये वाटपाबाबत कथन केलेले असल्याने २४ वर्षांच्या विलंबानंतर वादीस दाव्यामध्ये वाटपाची मागणी संदर्भात दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु, प्रस्तुत दाव्यामध्ये वादींनी प्रस्तावित दुरुस्तीअन्वये लगत धारक व सहधारकांना नाममात्र पक्षकार करणेबाबत विनंती केलेली आहे. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यातील परिस्थिती व दाखल न्यायनिर्णयातील तथ्ये भिन्न असल्याने ते या प्रकरणास लागू होत नाहीत. शिवाय, वादींतर्फे दाखल *Jwaladutta Janakidas (Supra)* या न्यायनिर्णयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने वादीस त्याने दाव्यात केलेल्या काही मागण्या रद्द करण्यास परवानगी दिली कारण तशी परवानगी न दिल्यास वादीस वेगळा दावा दाखल करावा लागला असता. प्रस्तुत प्रकरणात वादींनी वाटपाची मागणी केलेली असल्याने सदर वाद हा वादी व प्रतिवादी यांचे मधीलच असलेने त्याकरीता सदर नाममात्र पक्षकारांविरुध्द वेगळा दावा दाखल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सबब, दाखल न्यायनिर्णयातील निरिक्षणे या प्रकरणास लागू होत नाहीत.

०९. प्रतिवादींतर्फे दाखल न्यायनिर्णयामध्ये मा. न्यायालयांनी अशी निरिक्षणे दिलेली आहेत की, ज्यावेळी प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यातील चौकशी सुरु झालेनंतर

मागितली असेल, प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलणार असेल आणि दुरुस्ती ही विलंबाने मागितली असताना विलंबाचे कारण दिलेले नसेल त्यावेळी सदर दुरुस्तीस परवानगी देता येणार नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये वादमुद्दे सन २०१४ साली काढल्यानंतर दावा चौकशीस लागलेला असुन वादींनी झालेल्या १० वर्षांच्या विलंबाकरीता कोणतेही कारण दिलेले नाही. त्यामुळे, सदर प्रतिवादीतर्फे दाखल न्यायनिर्णयांतील निरिक्षणे या प्रकरणास लागू होतात.

१०. एकंदरित, वादी व प्रतिवादी यांचे कथने आणि दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तावित दुरुस्तीने दाव्यात सामील करण्यात येणारी व्यक्ती हे या दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार नाहीत. त्यामुळे, त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणुन सामील करण्याची आवश्यकता नाही. तसेच, दावा वाटपाकरीता दाखल असल्याने दाव्याचे गुणदोषावर निकालाकरीता सदर प्रस्तावित दुरुस्तीची आवश्यकता नाही. शिवाय, दावा हा चौकशीकरीता लागलेला असुन प्रस्तुत दुरुस्तीचा अर्ज हा १० वर्षांच्या विलंबाने दाखल केलेला असताना विलंबाचे कोणतेही कारण दिलेले नाही. त्यामुळे, सदर प्रस्तावित दुरुस्तीस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ च्या निर्बंधाची बाधा येते. शिवाय, सदर दुरुस्तीने वादींनी मागणी केल्याप्रमाणे एकुण १८ प्रतिवादींना दाव्यात त्यांची आवश्यकता नसताना सामील केल्यास दावा निकाली होण्यास बराच विलंब होणार आहे आणि त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. याऊलट, सदर १८ व्यक्ती हे वादींच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत दाव्यास नाममात्र पक्षकार असल्याने त्यांना दाव्यात सामील न केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
RATHOD SUJIT
Date: 2024.10.03
17:39:01 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०१/१०/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 01/10/2024 |
| Order signed by P.O. on | 01/10/2024 |
| Order uploaded on | 03/10/2024 |